


परळी
# संघर्षनेता
समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता.

https://www.parlisangharshneta.in 9881265102 संपादक - मोहन व्हावळे



बीड | वर्षे- 11 वे | अंक क्र 103 | शुक्रवार दि. 08 मे 2026 | पृष्ठे 4 | किंमत 2 ₹ | RNI: MAHMAR/2016/67060

# पशुसंवर्धन विभागात अधिकारी पदासाठी मोठी भरती

## ना. पंकजाताई मुंडे यांनी दिली खुशखबर

### पशुधन विकास अधिकारी पदाच्या 2 हजार 795 तर सहाय्यक आयुक्त पदाच्या 308 जागा भरण्याची प्रक्रिया सुरू



मुंबई, दि. 7 : राज्यातील पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदांच्या भरतीबाबत राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी सर्वांना खुशखबर दिली आहे. राज्यात पशुधन विकास अधिकारी पदाच्या 2 हजार 795 तर सहाय्यक आयुक्त पदाच्या 308 जागा भरण्याची प्रक्रिया महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने सुरु केली असून तशी जाहिरात प्रसिद्ध केली आहे.

पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदांमुळे ग्रामीण भागातील पशुवैद्यकीय सेवांवर पडणारा ताण कमी करण्यासाठी या पदांच्या भरती प्रक्रियेला गती देण्यासाठी पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश आले आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने पशुधन विकास अधिकारी, महाराष्ट्र पशुसंवर्धन सेवा गट 'अ'च्या 2 हजार 795 आणि सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन गट 'अ'च्या 308 पदांसाठी संगणक प्रणालीवर आधारित चाळणी परीक्षा घेण्याचा निर्णय जाहीर केला आहे. ही परीक्षा 11 जून 2026 रोजी मुंबई, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर येथे होणार आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने याबाबत प्रसिद्धीपत्रक जारी केले असून संबंधित उमेदवारांची परीक्षा सायंकाळी 5.30 ते 7 या वेळेत होणार असल्याचे नमूद केले आहे. परीक्षेतील गुणांच्या आधारे स्वतंत्र गुणवत्ता यादी तयार करण्यात येणार असून त्यानंतर पुढील निवड प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

राज्यातील पशुसंवर्धन पान 3 वर

# बीड महामार्ग भूसंपादन घोटाळा


## तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक पोलिसांच्या ताब्यात




बीड/लातूर: बीड जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गाच्या भूसंपादन आणि मावेजा वाटपातील कथित कोट्यवधी रुपयांच्या घोटाळ्याचा तपास आता थेट जिल्ह्याच्या सर्वोच्च पदापर्यंत पोहोचला आहे. या प्रकरणातील संशयित आरोपी आणि बीडचे तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना पोलिसांनी लातूरमधील त्यांच्या राहत्या घरातून ताब्यात घेतले आहे. एसआयटीने (SIT) दिवसभर केलेल्या कसून चौकशीनंतर ही कारवाई केल्याने प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. बीड जिल्ह्यातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गासाठी झालेल्या जमीन संपादनावेळी शेतकऱ्यांना मिळणाऱ्या मावेजात आणि जमिनीच्या मूल्यांकनात प्रचंड फेरफार करून कोट्यवधी रुपयांचा अपहार झाल्याचा आरोप आहे. या प्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात यापूर्वीच 10 जणांविरुद्ध गुन्हा दाखल पान 3 वर

# आज ठळक

## दहावीच्या निकालाची तारीख जाहीर




पुणे : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे (राज्य मंडळ) दहावीच्या परीक्षेचा निकाल शुक्रवारी (8 मे) जाहीर करण्यात येणार आहे. दुपारी एक वाजल्यापासून विद्यार्थ्यांना निकाल ऑनलाइन पाहता येणार आहे.

राज्य मंडळाचे सचिव डॉ. दीपक माळी यांनी अधिकृत परिपत्रकाद्वारे ही माहिती दिली. राज्य मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्चमध्ये घेण्यात येणारी दहावीची परीक्षा 20 फेब्रुवारी ते 18 मार्च दरम्यान आयोजित करण्यात आली होती.

या परीक्षेसाठी आठ लाख 65 हजार 740 विद्यार्थी, सात लाख 49 हजार 736 विद्यार्थिनी आणि 15 तृतीयपंथी विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. राज्यातील एकूण 23 हजार 683 शाळांमधून विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून संपूर्ण राज्यातील पाच हजार 111 परीक्षा केंद्रांवर ही परीक्षा घेण्यात आली.

गेल्या वर्षी दहावीच्या परीक्षेचा निकाल 13 मे रोजी जाहीर करण्यात आला होता. त्यामुळे गेल्यावर्षीच्या तुलनेत यंदा दहावीचा निकाल आठ दिवस लवकर जाहीर केला जाणार आहे. गेल्या वर्षी बारावीचा निकाल 94.10 टक्के लागला होता.

## महाराष्ट्रात नगरपरिषद-नगरपंचायतीचे पोटनिवडणूक जाहीर



महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील विविध नगरपरिषदा आणि नगरपंचायतींमधील रिक्त पदांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. या निवडणुकांमध्ये अकोला जिल्ह्यातील पातूर नगरपरिषदेची संपूर्ण निवडणूक (अध्यक्ष आणि सदस्य पदांसह) तसेच राज्यातील इतर प्रभागांमधील पोटनिवडणुकांचा समावेश आहे.कोणत्या नगरपरिषदांची होणार निवडणूक?पातूर नगरपरिषद (जि. अकोला): 1 अध्यक्ष आणि 20 सदस्य पदांसाठी संपूर्ण निवडणूक होणारस्थगित प्रभागांतील निवडणूक:उमेदवारांच्या निधनामुळे स्थगित झालेल्यामनमाड (जि.नाशिक)पिंपळनेर (जि.धुळे)गेवराई (जि.बीड)अकोट (जि. अकोला)11 जिल्ह्यांतील 14 नगरपंचायतींमध्ये 15 रिक्त जागा3 नगरपरिषदांमध्ये 3 रिक्त जागा 14 जिल्हे, 8 नगरपरिषदा आणि 14 नगरपंचायतींमधील एकूण 47 रिक्त जागांसाठी निवडणूकनिवडणूक कार्यक्रमकार्यक्रम जाहीर 12 मे 2026अर्ज दाखल 18 मे ते 25 मे (सकाळी 11 ते दुपारी 3)अर्ज छाननी 26 मे (सकाळी 11 पासून)अर्ज मागे घेणे 27 मे ते 2 जून मतदान 20 जून (सकाळी 7:30 ते सायं. 5:30) मतमोजणी व निकाल 21 जून

# परळीमध्ये जे. के. कन्स्ट्रक्शन वतीने 9 मुस्लिम जोडप्यांचा सामूहिक विवाह सोहळा उत्साहात संपन्न







परळी, प्रतिनिधी —जे. के. कन्स्ट्रक्शन,खान ब्रदर्स यांच्या संयुक्त विद्यमाने जेके फंक्शन हॉल येथे गरीब मुस्लिम जोडप्यांसाठी सामूहिक विवाह सोहळ्याचे (इजतेमाई शादियां 2026) भव्य आयोजन करण्यात आले. या सोहळ्यात एकूण 9 मुस्लिम जोडपी विवाहबंधनात अडकली.

या प्रसंगी परळी तालुका व शहरातील विविध भागांतील प्रतिष्ठित मान्यवर, समाजसेवक, व्यापारी, धार्मिक नेते तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी नवविवाहित जोडप्यांना शुभेच्छा देत त्यांच्या उज्ज्वल वैवाहिक जीवनासाठी आशीर्वाद दिले.

कार्यक्रमात सामाजिक ऐक्य, बंधुभाव आणि समाजातील गरजू कुटुंबांना आधार देण्याचा संदेश देण्यात आला. आयोजकांच्या वतीने सर्व पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले तसेच विवाह सोहळ्याची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. पान 3 वर

## एकनाथ शिंदेंचं हेलिकॉप्टर वादळात अडकलं, मुंबईत इमर्जन्सी लँडिंग



मुंबई: शिवसेना मुख्य नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे एका मोठ्या अपघातातून थोडक्यात बचावले आहेत. खराब हवामान आणि सोसाट्याच्या वादळी वाऱ्याचा एकनाथ शिंदेंच्या हेलिकॉप्टरला मोठा फटका बसला आहे. वैमानिकाच्या प्रसंगावधामुळे हेलिकॉप्टर सुरक्षितपणे जुहू एअरपोर्टवर उतरवण्यात यश आले असून, सर्व प्रवासी सुखरूप आहेत.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे मुंबईतील महालक्ष्मी रेसकोर्स येथील हेलिपॅडवरून कल्याण पान 3 वर

## परळीतील गर्भवती महिला हेळसांड प्रकरणाची जिल्हा शल्यचिकित्सकांकडून गंभीर दखल




परळी वैजनाथ (प्रतिनिधी) : परळी शहरातील गित्ते हॉस्पिटल या खाजगी रुग्णालयात गर्भवती महिलेच्या उपचारादरम्यान हलगर्जीपणामुळे गर्भातील बाळाचा मृत्यू झाल्याच्या गंभीर प्रकरणाची जिल्हा शल्यचिकित्सकांनी तातडीने दखल घेतली आहे. या प्रकरणी प्राप्त झालेल्या तक्रारीनंतर जिल्हा शल्यचिकित्सक बीड डॉ.सतिशकुमार साळुंके यांनी हा प्रकार अत्यंत गंभीर स्वरूपाचा असल्याचे निरीक्षण नोंदवत सखोल चौकशीचे आदेश दिले आहेत.

तक्रारदार वैजनाथ संभाजी मुंडे यांनी डॉ.कल्पना सचिन गित्ते या डॉक्टरांवर उपचारात निष्काळजीपणा, वेळेवर योग्य वैद्यकीय निर्णय न घेणे, मृत भ्रूण तब्बल 22 तास मातेच्या पोटात ठेवणे तसेच आर्थिक शोषण केल्याचे गंभीर आरोप पान 3 वर

## "सरस्वती नदी वाचवा; कॉँक्रीटीकरण नव्हे तर पुनर्जीवन करा" — परळी नगरपरिषदेला निवेदन



परळी वैजनाथ : धार्मिक, ऐतिहासिक आणि पर्यावरणीय दृष्ट्या महत्त्व असलेल्या सरस्वती नदीच्या काँक्रीटीकरण प्रकल्पाविरोधात सामाजिक कार्यकर्ते अश्विन मोगरकर यांनी परळी वैजनाथ नगरपरिषदेला सविस्तर निवेदन देत हा प्रकल्प तात्काळ रद्द करण्याची मागणी केली आहे.

नगरपरिषदेकडून दि. 30 एप्रिल 2026 रोजी देण्यात आलेल्या पत्राला उत्तर देताना मोगरकर यांनी म्हटले आहे की, सरस्वती नदी ही नैसर्गिक नदी असल्याचे तसेच ती पूर्वी बाराही महिने वाहत असल्याचे नगरपरिषदेकडून प्रथमच अधिकृतरीत्या मान्य करण्यात आले आहे. भूमी अभिलेख कार्यालयाकडे नदीची नैसर्गिक हद्द कायम करण्यासाठी मोजणीची मागणीही करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले.

निवेदनात नगरपरिषदेवर गंभीर आरोप करण्यात आले असून, नदीत थेट सांडपाणी व गटाराचे पाणी सोडले जात असल्यामुळे जलप्रदूषण प्रतिबंधक कायद्यांचे उल्लंघन होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच नदीपात्रातील अतिक्रमण रोखण्यात नगरपरिषद अपयशी ठरल्याचे सांगत, सरस्वती नदीपात्रात उभारण्यात आलेल्या अर्धवट शॉपिंग कॉम्प्लेक्समुळे पूरस्थिती निर्माण होऊन पान 3 वर

## मराठवाडा तहानला! 92 गावे आणि 36 वाड्यांना 156 टँकर्सचे पाणी; 3 लाख नागरिकांची वणवण



छत्रपती संभाजीनगर : मराठवाड्यातील ग्रामीण भागाला वाढत्या तापमानाच्या झळा सोसाव्या लागत आहेत. विभागात कमाल तापमान 40 ते 42 अंशांच्या आसपास नोंदविले जात आहे. त्याचा परिणाम जलसाठ्यांवर होत आहे. विभागातील 92 गावे आणि वाड्यांमध्ये 156 टँकरने पाणीपुरवठा सुरु झाला आहे. मे महिना लागल्यामुळे हा आकडा वाढला आहे. छत्रपती संभाजीनगर, जालना, लातूर या तीन जिल्ह्यांतील गावांमध्ये सध्या टँकर सुरु आहेत. यात 36 पान 3 वर

## उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या नि :स्वार्थ कार्याला प्रेरित होऊन पिंपरी (बू ) गावातील असंख्य तरुणानी भगवा घेतला हाती



परळी ( प्रतिनिधी ) : महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ रावजी शिंदे साहेब यांच्या विकासाभिमुख कार्याला प्रभावित होऊन आज महाराष्ट्रातील हजारो कार्यकर्ते नेते शिंदे साहेबांचं नेतृत्व स्वीकारून जनतेच्या सेवेत स्वतःला अर्पण करत आहेत. आपल्या शिवसैनिकांच्या हाकेला ओ देऊन त्यांच्या पाठीशी उभे राहण्याची ठाम भूमिका शिंदे साहेब घेतात.

आज शिवसेना मध्यवर्ती कार्यालयात तालुका प्रमुख व्यंकटेश शिंदे यांच्या हस्ते शिवसेना शहर प्रमुख वैजनाथ माने, तालुका समन्वयक माऊली फड, युवासेना तालुका प्रमुख बाबा सोनवणे यांच्या उपस्थितीत एकनाथजी शिंदे साहेब यांच्या कार्याला आकर्षित होऊन पिंपरी (बु) येथील कार्यकर्ते आबासाहेब काळे, गणेश शिंदे, डॉ बळीराम गिरी, गौतम पौळ, किशोर पौळ, हरिश्चंद्र मोरे, लक्ष्मण सपकाळ, सुनील, पारेकर, बळीराम ढेकळे, नवनाथ कदम यांच्या सह अनेक कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला आहे. पान 3 वर

## श्री शनैश्वर जन्मोत्सवा निमित्त विविध धार्मिक, सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन.. शनिवारी शोभायात्रा



परळी वैजनाथ दि.07 (प्रतिनिधी) येथील शनिमंदिर देवस्थान ट्रस्ट च्यावतीने श्री शनैश्वर जन्मोत्सवा निमित्ताने विविध धार्मिक, सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन रविवार (दि.10) ते शनिवार (दि.16) करण्यात आले आहे. तर शनिवारी सायंकाळी सहा वाजता भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे.

येथे दरवर्षी शनैश्वर जन्मोत्सवा निमित्त राष्ट्रसंत शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपुरकर व सिध्दलिंग शिवाचार्य महाराज साखरखेर्डेकर यांच्या प्रेरणेने अखंड शिवनाम सप्ताह, श्री. ग्रंथराज परमरस्य पान 3 वर

# आरोग्यम धनसंपदा : उपचार की व्यापार?

## भाग 1

### ➔ जोशींचीतासिक




शीर्षटिप : माझे काही नातेवाई, मित्र मैत्रिणी, स्नेही वैद्यकीय क्षेत्रात (शासकीय व खाजगी) कार्यरत आहेत. त्यामुळे कोणतेही सरसकटीकरण करणारा हा लेख नाही. सन्माननीय अपवाद वगळता वैद्यकीय क्षेत्र कसे आहे हे आपण सारे जाणतोच.

सिनेमा पडद्यावर, क्रूरता परळीच्या भूमीवर

परळी वैजनाथमध्ये नुकतीच एक गंभीर घटना समोर आली आहे. अक्षय कुमारच्या "गब्बर इज बॅक" चित्रपटाप्रमाणे मृत भ्रूण मातेच्या पोटात 22 तास ठेऊन त्या कुटुंबांची आर्थिक लूट केल्याचा आरोप होत आहे. तशी तक्रार पीडित कुटुंबाने सरकार दरबारी दाखल केली आहे. त्यानुषंगाने आज हा लेखनप्रपंच जो फक्त परळी वैजनाथपुरता मर्यादित नसून सर्वत्र कमी अधिक प्रमाणात लागू होऊ शकतो.

कोणाच्याही घरी वैद्यकीय अडचण निर्माण झाली की सारं घर हैराण होत. त्या कुटुंबातील व्यक्तींची शारीरिक, मानसिक व आर्थिक हेळसांड होते.

तालुक्यापासून मुंबईपर्यंत: रुग्णाचा जीवघेणा प्रवास

आपल्या इथले शासकीय दवाखाने सक्षम नाहीत म्हणून रुग्ण प्रथम इथल्या खाजगी रुग्णालयात उपचारासाठी जातात. तिथे काही काळ उपचारानंतर हजारो, लाखोंचे बिल होऊनही फरक पडला नाही की मग लातूरला रेफर केले जाते.

तिथेही हीच प्रक्रिया पुन्हा रिपीट करून पेशंट पुण्याला पाठवला जातो. एव्हाना त्या कुटुंबांची आर्थिक बाजू पूर्णतः कोलमडलेली असते. वेळेत मिळाल्या तरी शासकीय योजनांचा मर्यादित लाभ मिळून उपयोग नसतो. शक्य असल्यास आहे नाही ते तारण ठेवून किंवा अवाजवी दराने कर्ज काढून पुण्याचा पर्याय संपला की रुग्ण आणि त्याचे कुटुंबीय मुंबईतील शासकीय रुग्णालय गाठतात.

सर जे. जे, सेंट जॉर्जेस, जी. टी., कामा आणि आल्ब्लेस, के. ई. एम., लोकमान्य टिळक, नायर, टाटा मेमोरियल आदी शासकीय रुग्णालये हे त्या वेळी संबंधितांना मंदिर वाटू लागतात. ज्यांना यातही यश येत नाही त्या कुटुंबातील सदस्यांची अवस्था काय होत असेल? ही कल्पनाच प्रचंड वेदनादायी आहे.

मग, माझा साधा प्रश्न आहे प्रत्येक तालुका, जिल्हा पातळीवरील शासकीय रुग्णालये मुंबई सारखे सक्षम का केल्या जात नाहीत?

सरकारी 'रेवड्या' नकोत, सक्षम 'रुग्णालये' हवीत!

शासनाने लाडकी बहीण अन् मोफत रेशन, बस तिकीट सारखे रेवडी कल्चर बंद करून सर्व रुग्णांना मोफत किंवा आवश्यक असल्यास माफक दरात रुग्णांवर उपचार करण्यासाठी सरकारी हॉस्पिटल सक्षम करावेत.

खाजगी क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर उपचारांचे दर, औषधांचा खर्च, पॅथॉलोजी, सोनोग्राफी, सी टी स्कॅन आदी द्वारे कशी लूट होते ते सुद्धा आपण जाणतोच. या अनुषंगाने सर्वत्र जनतेने हा विषय हाती घेणे आवश्यक आहे. याबाबत एक लेख मालिका सुरु करत आहे त्यासाठी तुमचे अनुभव, निरीक्षण आणि सूचनांचे स्वागत आहे.

**जय हिंद □□**
**अनिरुद्ध जोशी, परळी वैजनाथ**
**चलभाष क्रमांक : 8983555657**
**दि. 7 मे 2026**

**तळटीप : कोणीही स्वतःवर ओढवून घेऊ नये ही विनंती.**

# एआय-पॉवर्ड स्टॉक रिसर्च प्लॅटफॉर्म्स : गुंतवणूकदारांसाठी संधी की उदयोन्मुख धोका?

**डॉ. भारत कऱ्हाड**



कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) ने आधुनिक जगातील जवळपास प्रत्येक क्षेत्रात मोठे परिवर्तन घडवून आणले आहे. शिक्षण, आरोग्य, उद्योग, प्रशासन आणि वित्तीय क्षेत्रामध्ये एआयचा वापर झपाट्याने वाढत आहे. विशेषतः शेअर बाजारामध्ये एआय-पॉवर्ड स्टॉक रिसर्च प्लॅटफॉर्म्स, स्टॉक पिकर्स, ऑटोमेटेड ट्रेडिंग सिस्टिम्स आणि शेअर प्राईस फोरकास्टिंग टूल्स यांची लोकप्रियता मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. "98 टक्के अचूकता", "गॅरंटीड रिटर्न्स", "एआय प्रेडिक्टेड मल्टिबॅगर स्टॉक्स", "10 पट इन्व्हेस्टमेंट ग्रोथ" अशा आकर्षक दाव्यांमुळे लाखो किरकोळ गुंतवणूकदार या प्लॅटफॉर्म्सकडे आकर्षित होत आहेत. मात्र या चमकदार आश्वासनांच्या मागे वास्तव काय आहे आणि गुंतवणूकदारांनी अशा प्लॅटफॉर्म्सचा वापर किती सावधपणे करावा, हे समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे.

एआय-पॉवर्ड स्टॉक रिसर्च प्लॅटफॉर्म्स मुख्यतः मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आर्थिक माहिती, कंपनीचे क्वार्टरली रिझल्ट्स, टेक्निकल चार्ट्स, मार्केट ट्रेंड्स, न्यूज सेण्टिमेंट आणि हिस्टॉरिकल स्टॉक डेटा यांचे विश्लेषण करतात. मशीन लर्निंग आणि डीप लर्निंग सारख्या तंत्रज्ञानाच्या मदतीने हे प्लॅटफॉर्म्स बाजारातील काही पॅटर्न्स ओळखण्याचा प्रयत्न करतात आणि भविष्यातील शेअर प्राईस मूव्हमेंटचा अंदाज बांधतात. तांत्रिकदृष्ट्या ही प्रणाली अत्यंत प्रगत आणि उपयुक्त ठरू शकते. एआय काही सेकंदांत प्रचंड प्रमाणातील माहिती प्रोसेस करू शकते आणि गुंतवणूकदारांना जलद माहिती उपलब्ध करून देऊ शकते.

मात्र याच ठिकाणी सर्वात मोठा धोका निर्माण होतो. अनेक प्लॅटफॉर्म्स "एक्स्ट्रीमली हाय अचूकता" किंवा "ऑलमोस्ट गॅरंटीड प्रेडिक्शन" असे दावे करतात. प्रत्यक्षात शेअर बाजार हा अत्यंत अनिश्चित आणि अस्थिर क्षेत्र आहे. जागतिक अर्थव्यवस्था, सरकारी धोरणे, व्याजदर, युद्धस्थिती, उद्योगातील बदल, कंपनीतील घोटाळे, गुंतवणूकदारांची मानसिकता आणि अचानक घडणाऱ्या घटनांमुळे बाजार काही मिनिटांत बदलू शकतो. जगातील सर्वात मोठ्या फायनान्शियल इन्स्टिट्यूशन्स आणि हेज फंड्स देखील सातत्याने इतकी अचूक भविष्यवाणी करू शकत नाहीत. त्यामुळे "98.6 टक्के प्रेडिक्शन अचूकता" सारखे दावे स्वतंत्र आणि ऑडिटेड पुराव्याशिवाय स्वीकारणे धोकादायक ठरू शकते.

आज अनेक वेबसाईट्स आणि मोबाईल ॲप्लिकेशन्स "एआय" या शब्दाचा वापर मार्केटिंग स्ट्रॅटेजी म्हणून करत आहेत. काही प्लॅटफॉर्म्स खरोखरच डेटा ॲनालिटिक्स आणि स्टॉक स्क्रीनिंगसाठी उपयुक्त असतात; परंतु काही ठिकाणी एआयचा वापर फक्त सबस्क्रिप्शन विकण्यासाठी किंवा प्रीमियम स्टॉक सिग्नल्स देण्यासाठी केला जातो. जलद नफा मिळवण्याच्या आशेने अनेक लहान गुंतवणूकदार अशा दाव्यांवर विश्वास ठेवतात आणि नंतर मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जातात.

भारतात इन्व्हेस्टमेंट ॲडव्हाईस देण्यासाठी सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया अर्थात सेबीकडून अधिकृत नोंदणी आवश्यक असते. त्यामुळे कोणताही एआय-बेस्ड स्टॉक प्लॅटफॉर्म वापरण्यापूर्वी तो सेबी रजिस्टर्ड इन्व्हेस्टमेंट ॲडव्हायझर किंवा रिसर्च ॲनालिस्ट आहे का, हे तपासणे अत्यंत महत्त्वाचे आहे. अनेक प्लॅटफॉर्म्स त्यांच्या वेबसाईटवर मोठमोठे दावे करतात; परंतु त्यांच्याकडे स्पष्ट रजिस्ट्रेशन डिटेल्स, ऑडिटेड परफॉर्मन्स रेकॉर्ड्स किंवा ट्रान्सपरंट मेथडॉलॉजी नसते. अशा गोष्टी गुंतवणूकदारांसाठी धोक्याचा इशारा मानल्या जातात.

ए आ य - ड्रि व्ह न इन्व्हेस्टिंगमधील आणखी एक गंभीर समस्या म्हणजे ब्लाइंड डिपेन्डन्सी. अनेक गुंतवणूकदार स्वतःचे संशोधन न करता एआय प्लॅटफॉर्मने सुचवलेले स्टॉक्स थेट खरेदी करतात. मात्र एआयचे प्रेडिक्शन्स उपलब्ध डेटावर आधारित असतात. भविष्यात अचानक होणारे राजकीय निर्णय, आर्थिक संकट, रेग्युलेटरी चेंजेस किंवा कंपनीतील अंतर्गत समस्या एआय पूर्णपणे ओळखू शकत नाही. एखाद्या कंपनीचे फंडामेंटल्स चांगले असले तरी अचानक घडलेल्या घटनांमुळे त्या कंपनीचा शेअर प्राईस मोठ्या प्रमाणात घसरू शकतो. त्यामुळे एआयला अंतिम आर्थिक तज्ञ न मानता सहाय्यक विश्लेषण साधन म्हणून वापरणे आवश्यक आहे.

सोशल मीडियामुळे एआय स्टॉक प्रेडिक्शन प्लॅटफॉर्म्सचा प्रभाव आणखी वाढला आहे. अनेक इन्फ्लुएन्सर्स "एआय-जनरेटेड मल्टिबॅगर स्टॉक्स" किंवा "एआय ट्रेडिंग सिक्रेट्स" या नावाखाली व्हिडिओज आणि ॲडव्हर्टाइजमेंट्स तयार करतात. काही वेळा हे पेड प्रमोशन्स असू शकतात. "संधी गमावण्याची भीती" निर्माण करून किरकोळ गुंतवणूकदारांना स्टॉक्स खरेदी करण्यास प्रवृत्त केले जाते. यामुळे पंप-अँड-डम्प सारख्या मार्केट मॅनिप्युलेशन प्रकारांनाही चालना मिळू शकते.

तथापि, एआय पूर्णपणे निरुपयोगी आहे असे म्हणणे चुकीचे ठरेल. योग्य पद्धतीने वापरल्यास एआय-पॉवर्ड प्लॅटफॉर्म्स अनेक प्रकारे उपयुक्त ठरू शकतात. उदाहरणार्थ:

कंपनीचे फंडामेंटल्स जलद समजून घेणे

मार्केट ट्रेंड्स ट्रॅक करणे

पोर्टफोलिओ डायव्हर्सिफिकेशन सुधारणे

रिस्क ॲनालिसिस करणे

अंडरव्हॅल्यूड स्टॉक्स शोधणे

न्यूज सेण्टिमेंट ॲनालिसिस करणे

विशेषतः नवोदित गुंतवणूकदारांसाठी एआय हे लर्निंग आणि रिसर्च टूल म्हणून उपयुक्त ठरू शकते. योग्य मानवी निर्णयक्षमता आणि आर्थिक शिस्त यांच्यासोबत एआयचा वापर केल्यास गुंतवणुकीची गुणवत्ता सुधारू शकते.

मात्र कोणतीही गुंतवणूक करण्यापूर्वी काही मूलभूत नियम पाळणे आवश्यक आहे: 1. स्वतःचे स्वतंत्र संशोधन करा. 2. सेबी रजिस्ट्रेशन तपासा. 3. गॅरंटीड रिटर्न्सवर विश्वास ठेवू नका. 4. सोशल मीडिया टिप्सवर ब्लाइंड ट्रस्ट करू नका. 5. रिस्क मॅनेजमेंटला प्राधान्य द्या. 6. सर्व पैसे एका स्टॉकमध्ये गुंतवू नका. 7. शॉर्ट-टर्म हायपपेक्षा लॉन्ग-टर्म फंडामेंटल्स महत्त्वाचे माना.

शेअर बाजार हा संयम, ज्ञान, शिस्त आणि भावनांवर नियंत्रण यांचा खेळ आहे. एआय टेक्नॉलॉजीमुळे गुंतवणूक प्रक्रिया अधिक आधुनिक आणि वेगवान झाली असली तरी जोखीम पूर्णपणे संपलेली नाही. भविष्यात एआयचे महत्त्व निश्चितपणे वाढणार आहे; परंतु मानवी अनुभव, विवेकबुद्धी आणि आर्थिक शिस्त यांची जागा एआय पूर्णपणे घेऊ शकणार नाही.

प्रत्येक गुंतवणूकदाराने पुढील दोन गोष्टी कायम लक्षात ठेवल्या पाहिजेत — एआय-पॉवर्ड स्टॉक रिसर्च प्लॅटफॉर्म्स अत्यंत सावधगिरीने वापरावे. एआय हे सहाय्यक विश्लेषण साधन आहे; नफा हमखास देणारे यंत्र नाही.

**डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य,**
**वराडकर महाविद्यालय**
**दापोली, जिल्हा रत्नागिरी.**

# पुणेकरांना दिलेली वाईट वागणूक रँडला भोवली

### ➔ (8-16 मे: चापेकर बंधू शहादत विशेष.)

चापेकर बंधू हे आद्यक्रांतिकारी होते. त्यांची नावे दामोदर हरिपंत चाफेकर यांचा जन्म दि.24 जून 1869, बाळकृष्ण हरिपंत चाफेकर यांचा जन्म 1873 आणि वासुदेव हरिपंत चाफेकर यांचा जन्म 1880 अशी होती. 19व्या शतकाच्या उत्तरार्धात पुण्याचे ब्रिटीश प्लेग कमिशनर वॉल्टर चार्ल्स रँड यांची हत्या करण्यात या क्रांतिकारकांचा सहभाग होता. पुण्यातील जनता ही नियुक्त केलेल्या अधिकारी आणि सैनिकांच्या अत्याचारांनी त्रस्त होती. या हत्येत महादेव विनायक रानडे हेही साथीदार होते. वासुदेव हरिपंत चाफेकरांचा जन्म सन 1880मध्ये चिंचवड मध्ये एका चित्पावन ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांनी मराठी भाषेमधून शिक्षण घेतले. कालांतराने ते पुण्यातील चिंचवड येथे स्थायिक झाले. वडील हरिपंत हे पुणे व मुंबई येथे हरिकथा सांगायचे. बालवयात तिघेही भाऊ कीर्तनात वडिलांना मदत करायचे. त्यांमुळे चाफेकर बंधूंच्या शिक्षणात खंड पडला होता. वासुदेव चाफेकर यांनी दामोदर चाफेकर आणि बाळकृष्ण चाफेकर या त्यांच्या बंधूंसह राजकारणात आणि क्रांतिकारी कारवायांमध्ये भाग घेतला. त्यांनी भारतीय तरुणांना शस्त्रांचे प्रशिक्षण दिले.

पुण्यातील राजकीय घडामोडींनी प्रेरित होऊन हे भाऊ क्रांतिकारक चळवळीकडे वळले. ब्रिटिशांनी आणलेल्या संमती वयाच्या विधेयकास त्यांचा तीव्र विरोध होता. भारतीय संस्कृतीत हस्तक्षेप करणाऱ्या ब्रिटिशांविरुद्ध टिळकांनी केसरीमधून घणाघाती प्रहार करायला सुरुवात केली होती. या आवाहनाने तीनही भाऊ प्रेरित झाले. त्यांनी लोकसंघटन केले. याचवेळी पुण्यात प्लेगच्या साथीने अक्राळविक्राळ स्वरुप धारण केल्याने ब्रिटिशांनी वॉल्टर चार्ल्स रँडला भारतात पाचारण केले. रँडने रोग निवारण करण्याच्या उपायांची सक्तीने अंमलबजावणी सुरु केली. हे करताना त्याने सामाजिक पायदंड पायदळी तुडवले. जसे की लोकांची घरे उपसून जाळणे, देवघरात जाऊन देवांचा अपमान करणे, तपासणीच्या नावाखाली महिलांशी अभद्र वर्तन करणे, कर्त्या पुरुषांना नामर्दाप्रमाणे हीन वागवणे. यामुळे चाफेकर बंधूच्या मनात ब्रिटिशाविरुद्ध तिरस्कार निर्माण झाला. या साऱ्यांचा सूड घेण्याची योजना त्यांनी तयार केली. वॉल्टर चार्ल्स रँडच्या पुण्यातील लोकांना दिलेल्या वाईट वागणुकीबद्दल या भावांनी त्याच्या वधाचा कट रचला. त्यावेळी व्हिक्टोरिया राणीच्या राज्यारोहणाचा हीरकमहोत्सव साजरा करण्यात येत होता. सगळीकडे रोषणाई करण्यात आली होती. तसेच मेजवानीचे आयोजन करण्यात आले होते. दामोदर चाफेकर या तरुणाने गाडी काढली व गणेश खिंड येथे वाट पाहत दि.22 जून 1897 रोजी मध्यरात्री निवासस्थानातून बाहेर पडलेल्या रँडवर जवळून गोळ्या झाडल्या. रँड हा काही काळ कोमात राहिला व कालांतराने दि.3 जुलै 1897 रोजी मरण पावला. याचवेळेस दामोदराच्या भाऊ बाळकृष्णाने रँड सोबत बसलेल्या लेफ्टनंट आयरिस्टवर गोळ्या झाडल्या. सर्वसामान्यपणे चापेकर असा उल्लेख चुकीचा होत असला तरी या क्रांतिकारक बंधूंचे आडनाव चाफेकर असे होते. चापे या नावाचे गाव कोकणात नाही. या खुनाच्या घटनेनंतर चाफेकर बंधू हे आमचे नातेवाईक नाहीत, हे पटवण्यासाठी अनेक चाफेकरांनी आपले आडनाव चापेकर आहे, असे सांगावयास सुरुवात केली.

त्यामुळे ब्रिटिश सरकार हादरून गेले. कित्येक दिवस ब्रिटिशांना मारेकऱ्यांचा शोध लागत नव्हता. शेवटी पंचमस्तंभि द्रविड बंधूनी- रामचंद्र व गणेश शंकर द्रविड यांनी या कटाची बातमी केवळ आर्थिक 20,000रु. च्या लाभपोटी सरकारला दिली. नंतर वासुदेव चाफेकर व महादेव रानडे यांनी द्रविड बंधूंना ठार केले. तिघाही भावांना पकडण्यात आले. दामोदराला मुंबईत अटक झाली व दि.18 एप्रिल 1898 रोजी त्यास येरवडा तुरुंगात फासावर चढवण्यात आले. त्यापाठोपाठ वासुदेवाला दि.8 मे 1899 व बाळकृष्णाला दि.16 मे 1899 रोजी फासावर चढवण्यात आले. अशा प्रकारे तीनही चाफेकर बंधू देशासाठी शहीद झाले. दामोदर चाफेकर यांनी आत्मचरित्र लिहिले होते, ते पोलिसांनी त्यांच्या ताब्यात ठेवले होते. पुढे हुतात्मा दामोदर हरी चाफेकर यांचे आत्मवृत्त या नावाने विठ्ठल गोपाळ खोबरेकर यांनी संपादित करून ते प्रकाशित केले. पुण्यानजीक असलेल्या चिंचवड गावाजवळच्या चौकाला चाफेकर चौक म्हणतात. या चौकात मध्यभागी एका टॉवरमध्ये दामोदर चापेकर यांचा सन 1971मध्ये उभारलेला पुतळा होता. मात्र तो पुतळा रस्ता रुंदीकरणाच्या व उड्डाणपुलाच्या कामाच्या कारणाने सन 2010मध्ये हलविण्यात आला. त्यानंतर चौकातच चापेकर बंधूंच्या समूह शिल्पाचे काम सुरु करण्यात आले होते. मात्र हे काम या ना त्या कारणावरून सतत रखडत होते. क्रांतिकारकांचे पुतळे तीन ते साडेतीन फुटांचे आणि त्यांखाली एक छोटा चौथरा अशा पद्धतीने काम चालू होते. परंतु क्रांतिवीर चाफेकर स्मारक समितीचे गिरीश प्रभुणे, बाळकृष्ण पुराणिक आदींनी या प्रकल्पातील त्रुटी निदर्शनास आणल्या. त्यानंतर तत्कालीन महापालिका आयुक्त डॉ.श्रीकर परदेशी यांनी चालू काम थांबवून नव्याने आराखडा करण्यास सांगितले. नव्या आराखड्यानुसार या चाफेकर चौकात दि.10 जुलै 2016 रोजी दामोदर चाफेकर व बाळकृष्ण चाफेकर यांचे 12 फूट उंचीचे उभे आणि वसुदेव चाफेकर आणि महादेव रानडे यांचे बसलेले सात फूट उंचीचे पुतळे उभारण्यात आले आहेत.

!! क्रांतिकारक चाफेकर बंधूंना त्यांच्या हौतात्म्य निमित्त मानाचा मुजरा !!

**- संकलन व सुलेखन -**
**श्री कृष्णकुमार आनंदी-**
**गोविंदा निकोडे गुरूजी.**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त मधुभाष- 7132796683.**

# महाराणा प्रताप ना कभी हारे ;ना अकबर कभी जीता !

मेवाडचे महाराणा प्रतापसिंह हे नाव जगप्रसिद्ध आहे. मेवाडच्या सिंहाने अकबरासारख्या बलाढ्य बादशहाशी,मेवाड आणि राजपुताना यांच्या स्वातंत्र्यासाठी 25 वर्षे तहान-भूक विसरून लढा दिला. मेवाडचे स्वतंत्र टिकवण्यासाठी त्यांनी केलेल्या संघर्षाला इतिहासात कुठेही तोड नाही.प्रतापसिंहाच्या तेजाने केवळ राजपुतानाच नव्हे तर संपूर्ण भारत प्रभावित झाला होता.त्यामुळेच प्रतापसिंहांना संपूर्ण भारतात पूज्य मानल्या जाते.भारतीय इतिहासात महाराणा प्रतापसिंह यांना आजही मोलाचे स्थान आहे.कारण महाराणा प्रताप यांच्या नावानेच त्याकाळी मुगल घाबरत असे.त्यामुळेच भारत भुमिला महाराणा प्रतापसिंहांचा मोठा अभिमान आहे. महाराणा प्रताप यांचा जन्म 9 मे 1540 साली उत्तर दक्षिण भारतातील मेवाड येथे झाला.त्याच्या वडिलांचे नाव राणा उदयसिंह.मेवाड, बुंदेलखंड आणि सिरोही वंशातील काही राजे आपला स्वाभिमान,धर्म आणि स्वतंत्रता टिकवून ठेवण्यासाठी अकबराशी प्राणपणाने लढले. पुढे उदयसिंह मेवाडचे राजा झाले.चित्तोडच्या युद्धानंतर चार वर्षांनी दिनांक 3 मार्च 1572 ला उदयसिंहांचे निधन झाले.यानंतर मेवाडचे संपूर्ण सुत्रे महाराणा प्रतापसिंह यांच्याकडे आले व त्यांचा राज्याभिषेक झाला.ज्यांचे नाव घेतल्याने सर्वांनाच स्फुर्ती येते असे महान तेजस्वी योध्दा म्हणजे महाराणा प्रताप.महाराणा प्रतापांनी प्रतिकुल परिस्थितीतही स्वतःच्या जीवाची पर्वा न करता मेवाडचे रक्षण केले.जयपूरचा राजा मानसिंग याने अकबरापासुन आपल्या राज्याला धोका पोहोचू नये म्हणून आपली बहीण अकबराला देऊन सोयरिक केली.अकबराने मेवाडला आपल्या अधिपत्याखाली आणण्यासाठी मानसिंहाला मेवाडला जाण्यास सांगितले. त्या निमित्ताने मानसिंग दिल्लीला जात असताना वाटेत मुद्दाम आपल्या वैभवाचे प्रदर्शन करण्याकरिता कुंभगडावर असलेल्या महाराणा प्रतापसिंह यांच्या भेटीस गेला.महाराणा प्रताप यांनी त्यांचा आदरसत्कार केला. परंतु मानसिंगच्या पंक्तीत बसून जेवण्यास नकार दिला. मानसिंहाने याचे कारण विचारले.यावर महाराणा प्रताप म्हणाले स्वतःच्या समशेरच्या बळावर आपल्या राज्याचे रक्षण करण्याऐवजी जे राजपूत आपल्या मुली-बहिणी मोगलांना देऊन त्यांच्यापासून राज्य रक्षण करतात,अशा अस्वाभिमानी राजपुतांच्या पंक्तीला मी बसत नाही.मी जर आपणासोबत जेवण केले तर बाप्पा रावळ,राणा सांगा, ह्या सारख्या थोर वंशाला काळीमा फासण्यासारखे होईल.हे ऐकून मानसिंहाच्या मनात खटकले आणि महाराणा प्रतापसिंह यांना धमकी देत म्हणाला महाराणा प्रतापसिंहजी आज आपण माझा अपमान केला ह्याचा बदला रणांगणात अवश्य घेईल व मानसिंह काय आहे हे दाखवून देईल.असे म्हणून तेथुन निघुन गेला आणि मानसिंह व महाराणा प्रतापसिंह यांच्यात कट्टर वैरत्व निर्माण झाले.ही घटना अती शिगेला पोहोचली व युध्दात रुपांतर झाली.राणाजींचे वक्तव्य नेहमीच मानसिंहाच्या मनाला खटकत होते.ही संपूर्ण घटना मानसिंहाने अकबराला सांगितली. पहिलेच मानसिंह तिलमिला झालेला होता आणि अकबराला मेवाड पाहिजे होते. याकरीता अकबर सर्वत्र जहर घोळण्याचे काम करीत होता.अशा परिस्थितीत अकबराने मानसिंहाच्या नेतृत्वाखाली दोन लाख प्रचंड सैन्य आणि अकबराचा मुलगा सलीम याला घेऊन हल्दीघाटीच्या दिशेने महाराणा प्रताप यांच्याशी युद्ध करायला निघाला. ही बातमी महाराणा प्रतापसिंह यांना कळताच त्यांनी आपले बावीस हजार सैन्य घेऊन अरवली पर्वताच्या कुंभलगड वाटेने जाणाऱ्या मानसिंहाच्या सैन्यावर बाणांनी छुपे हल्ले करून बरेचसे सैनिक धाराशाही केले. दोन लाख सैन्याशी बावीस हजार सैन्य लढा देत होते. महाराणा प्रतापसिंह यांच्या तलवारीचा वार अकबराचा मुलगा सलीमवर बसणार तितक्यात सलिमचा हत्ती हालला आणि तो तलवारीचा वार हत्तीवर बसला आणि सलिम वाचला.महाराणा प्रतापसिंहांच्या भितीने मानसिंह आपल्या सैन्यासह पिछाडीवर रहाला.हे घनघोर युद्ध अनेक दिवस चालले.राणाजी आपल्या तलवारीने वेढा कापत सामोरं जाण्याचा प्रयत्न करु लागले.महाराणा प्रतापसिंह जखमी झालेले पाहून मानसिंह अत्यंत दुःखी झाला.आपण कुठेतरी चुकत आहोत हे त्यांच्या लक्षात आले व मेवाडच्या रक्षणासाठी आपण येथुन निघून जाण्यास विनंती केली व प्रतापसिंहानी ती मान्य केली. प्रतापांचे छत्र आणि मुकुट मानसिंहाने स्वतः डोक्यात घातले.मानसिंहाला महाराणा प्रतापसिंह समजून मोगलांनी आक्रमण केले.अनेक मोगलांना त्यांनी ठार मारले व शेवटी विरगतीरला प्राप्त झाले.तेवढ्यातच शत्रू सैनिकांनी राणाजींचा घोडा चेतक याच्या पायावर तीर सोडून वार केला. त्याचा पाय निकामी झाला.अशाही परिस्थितीत स्वामिनिष्ठ घोड्याने वेढ्याचा भेद करून व संपूर्ण वेढा चिरत दूर निघून गेला.वाटेत एक ओढा लागला चेतकने उडी घेऊन तो ओढा पार केला आणि काही दुर जाऊन चेतकने प्राण सोडला. आपला पाठलाग कोण करीत आहे हे पहाण्यासाठी राणाप्रतापांनी मागे फिरुन पहिले,तर अकबराला जाऊन मिळालेला आपला धाकटा भाऊ शक्तीसिंह व त्यांच्या बरोबर चार-पाच मोगल सैनिकांना जिवे मारीत होता.राणाजी हे दृश्य पाहून अचंबित झाले.यानंतर शक्तीसिंह राणाजींजवळ आले आणि त्यांना आलिंगन देऊन म्हणाला दादा तुझ्या सारखे शौर्य आणि कणखर मन यांच्या अभावामुळे मी जरी मोगलांची सरदारकी करीत असलो तरी तूच माझा आदर्श आहे.या हल्दीघाटीच्या युद्धानंतर अकबराने महाराणा प्रतापसिंह यांच्यावर अनेक आक्रमणे केली. मात्र अकबर महाराणा प्रतापसिंह यांना पराभूत करु शकला नाही.हल्दीघाटी हे इतिहासातील सर्वात मोठे युद्ध मानल्या जाते.प्रतापांना हरविण्यासाठी शेवटचा उपाय म्हणून अकबराने पराक्रमी योद्धा जगन्नाथला मोठ्या सेनेसह 1584 मध्ये मेवाडवर आक्रमक करण्यास पाठविले.परंतु 2 वर्षे अथक प्रयत्न करुनही तो महाराणा प्रतापसिंह यांना पकडू शकला नाही किंवा हरवू शकला नाही.अशाप्रकारे प्रबळ महत्त्वाकांक्षी, दृढनिश्चयी, धैर्यशील, उज्वल कीर्तीवंत आणि साहसी अशा महाराणा प्रतापसिंहाला शमविण्याचा प्रयत्न अकबराने केला पण सर्व प्रयत्न निष्फळ ठरले.21 जून 1576 रोजी चेतकने (घोड्याने) महाराणा प्रतापसिंहांना निरोप दिला.आजही हल्दीघाटी येथील राजसमंद येथे चेतकची समाधी आहे. त्याकडे पहाणारे सर्वच प्रतापांच्या मूर्तीप्रमाणेच श्रध्देने पाहतात.19 जानेवारी 1597 रोजी महाराणा प्रतापसिंह यांची प्राणज्योत मावळली.भारतीय इतिहासात महाराणा प्रतापसिंहाचे नाव राष्ट्र, धर्म, संस्कृती, स्वाभिमान यासाठी आजही मानाने घेतले जाते.जोपर्यंत सुर्य-चंद्र, आकाश-पाताळ आहे तोपर्यंत प्रतापांचे नाव अमर राहील. परमप्रतापी महाराणा प्रतापसिंहांना जयंती निमित्त कोटी-कोटी प्रणाम! जय हिंद!



**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार)**
**मो.नं.9921690779, नागपूर.**

**हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी ॲक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com**

## पान 1 वरुन

विभागात मोठ्या प्रमाणावर अधिकारी रिक्त असल्याने पशुवैद्यकीय सेवा, पशुधन आरोग्य तपासणी, लसीकरण आणि ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना तातडीची मदत देण्यात अडचणी येत होत्या. या पार्श्वभूमीवर पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता.

या निर्णयाबाबत आनंद व्यक्त करताना पशुसंवर्धन मंत्री मुंडे म्हणाल्या की, खूप दिवस झाले आपण ज्या अत्यंत आनंदाच्या बातमीची प्रतीक्षा करत आहात, ती बातमी तुम्हा सर्वांना देण्यासाठी मला आनंद होत आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत पशुधन विकास अधिकारी गट 'अ' या पदासाठी 2795 तर सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन गट 'अ' या पदासाठी 308 जागांच्या परीक्षा घेण्याचा निर्णय झालेला आहे. 11 जून 2026 रोजी ही परीक्षा आहे. एवढे सर्व अधिकारी पशुसंवर्धन खात्यात रुजू झाल्यानंतर विभागाच्या कामाला मोठा वेग मिळेल. ग्रामीण भागातील लोकांच्या आणि त्यांच्या पशुधनाची अधिक चांगली काळजी घेणे शक्य होईल."

या भरतीमुळे राज्यातील पशुवैद्यकीय यंत्रणेला मोठे बळ मिळणार असून ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करुन या परीक्षेला बसणाऱ्या सर्व परीक्षार्थींना मुंडे यांनी परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.

------------------------------------

करण्यात आला होता, ज्यात पाठक यांच्या नावाचाही समावेश होता. सुरुवातीला या प्रकरणाचा तपास पोलीस उपाधीक्षक पूजा पवार यांच्याकडे होता. मात्र, सध्या हा तपास एम. व्यंकटराम यांच्या नेतृत्वाखालील पथक करत आहे. पोलिसांनी ठोस पुराव्यांच्या आधारे ही कारवाई केली असून, पाठक यांना ताब्यात घेतल्याने आता या घोटाळ्यातील इतर बड्या माशांचे धाबे दणाणले आहेत.

-------------------------------------

समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांसाठी अशा प्रकारचे सामूहिक विवाह सोहळे हे मोठे आधारस्थान ठरत असून, या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात येत आहे.

जाफर खान उस्मान खान, परळीचे उपनगराध्यक्ष हाजी राजा खान उस्मान खान, उमर खान उस्मान खान, एजाज खान उस्मान खान, वाहेद खान जाफर खान, शाहेद खान राजा खान, शेख मझहरुद्दिन अलीमोदिन, जफर खान जाफर खान, नदीम खान जाफर खान, मुफ्ती तारेक खान एजाज खान, फेरोज खान उमर खान, फाजेब खान उमर खान, तौफिक खान एजाज खान अदीनी परिश्रम घेतले

-------------------------------------

आणि मुरबाड दौऱ्यासाठी रवाना झाले होते. हेलिकॉप्टरने उड्डाण केल्यानंतर काही वेळातच हवामानात अनपेक्षित बदल झाला. कल्याण परिसरात अचानक वादळी वारा आणि पावसाचे वातावरण निर्माण झाले. हे हेलिकॉप्टर हवेत असतानाच या वादळाच्या तडाख्यात सापडले. सोसाट्याचा वारा आणि खराब दृश्यमानतेमुळे हेलिकॉप्टरवर नियंत्रण मिळवणे कठीण झाले होते. अशा गंभीर परिस्थितीत प्रसंगावधान राखून वैमानिकाने तांत्रिक कौशल्याचा वापर केला आणि हेलिकॉप्टरला वादळाच्या क्षेत्रापासून सुरक्षित अंतरावर नेले. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून वैमानिकाने हेलिकॉप्टर तात्काळ जुहू विमानतळाच्या दिशेने वळवले आणि तिथे यशस्वी 'इमर्जन्सी लँडिंग' केले.

--------------------------

केले आहेत. या आरोपांमुळे वैद्यकीय क्षेत्रात मोठी खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा शल्यचिकित्सका डॉ.सतिशकुमार साळुंके यांनी तातडीने चार सदस्यीय वैद्यकीय चौकशी समिती नियुक्त केली आहे. संबंधित रुग्णालयातील उपचार प्रक्रिया, वैद्यकीय नोंदी, डॉक्टरांची भूमिका, उपचारातील विलंब तसेच रुग्णाच्या प्रकृतीशी संबंधित सर्व बाबींची सखोल तपासणी समितीकडून केली जाणार आहे. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सतिशकुमार साळुंके यांनी स्पष्ट केले आहे की, हे प्रकरण अतिशय गंभीर स्वरूपाचे आहे. या प्रकरणी अतिशय गांभीर्यपूर्वक व वस्तुनिष्ठ चौकशी तातडीने करण्यात येईल. चौकशी अहवाल प्राप्त होताच दोषी आढळणाऱ्यांविरोधात नियमानुसार कठोर प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करण्यात येईल. रुग्णांच्या जीवाशी कोणत्याही परिस्थितीत खेळ सहन केला जाणार नसल्याचेही त्यांनी नमूद केले.

दरम्यान, या घटनेमुळे परळी शहरासह परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले असून संबंधित कुटुंबाला न्याय मिळावा आणि दोषींवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी विविध स्तरांतून होत आहे. पोलीस प्रशासना कडूनही या प्रकरणाचा समांतर तपास सुरू असल्याची माहिती पोलीस निरीक्षक रघुनाथ नाचण यांनी दिली आहे.

------------------------------------------

नागरिकांचे नुकसान होत असल्याचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला आहे.

मोगरकर यांनी काँक्रीटीकरणामुळे भूजल पुनर्भरण थांबून जुन्या गावभागातील विहिरी, आड आणि बोअरवेलवरील पाणीसाठ्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो, असा इशारा दिला आहे. "नदीचे रुंदीकरण व खोलीकरण आवश्यक असले तरी पूर्ण सिमेंट काँक्रीटीकरण भविष्यातील जलसंकटाला आमंत्रण देणारे ठरेल," असे त्यांनी निवेदनात म्हटले आहे.

नगरपरिषदेकडून नदीतील पाण्याचा BOD आणि COD स्तर धोकादायक असल्याचे नमूद करण्यात आले असल्याने मागील पाच वर्षांतील तपासणी अहवाल सार्वजनिक करावेत, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

परळी शहरात सुमारे 101 कोटी रुपयांची भूमिगत गटार योजना सुरु असताना, सर्व सांडपाणी STP प्रकल्पात प्रक्रिया होणार असल्यास नदी काँक्रीटीकरणाची आवश्यकता काय, असा सवालही त्यांनी उपस्थित केला आहे.

तसेच प्रभू वैद्यनाथ मंदिरासाठी मंजूर झालेल्या तीर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत सरस्वती नदीचे पुनर्जीवन व संवर्धन व्हावे, अशी परळीकरांची अपेक्षा असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

"सरस्वती नदीतील काँक्रीटीकरणाचे काम लोकहिताचे नसून भविष्यात गंभीर पर्यावरणीय व जलसंकट निर्माण करु शकते. त्यामुळे हा प्रकल्प त्वरित रद्द करण्यात यावा, अन्यथा नागरिकांच्या तीव्र आंदोलनाला सामोरे जावे लागेल," असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

----------------------------------

वाड्यांचा समावेश आहे. सुमारे तीन लाख नागरिकांना टँकरच्या पाण्यावर तहान भागवावी लागत आहे. मराठवाड्याची राजधानी असलेल्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात सर्वाधिक 115 टँकर सध्या सुरु आहेत. छत्रपती संभाजीनगरमध्ये टँकरसाठी 37, टँकर व्यतिरिक्त 47 मिळून 84 विहिरींचे अधिग्रहण केले आहे, तर जालन्यात 42 व लातूरमध्ये 24 विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे. उर्वरित जिल्ह्यासंह 268 विहिरी ताब्यात आहेत. 156 खासगी, तर पाच शासकीय टँकरने सध्या पाणीपुरवठा सुरु आहे. विभागातील 75 मध्यम प्रकल्पात सध्या 42 टक्के, तर 758 लघु प्रकल्पात सध्या 32 टक्के पाणीसाठा आहे. मोठ्या 11 प्रकल्पांमध्ये सुमारे 53 टक्के जलसाठा आहे. विभागात 48 टक्क्यांपर्यंत जलसाठा सध्या आहे.

-----------------------------------------

शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांनी हिंदुत्वचा दिलेला विचार, उपमुख्यमंत्री एकनाथ रावजी शिंदे साहेबांनी शिंदे महाराष्ट्रा साठी केलेलं कार्य गाव गाड्यातील प्रत्येक माणसा पर्यंत पोहचवून गाव तिथे शाखा आणि घर तिथे शिव सैनिक हा संकल्प घेऊन कामाला लागण्याचा निर्धार यावेळी सर्व शिवसैनिकांनी केला.

---------------------------------------

पारायण सोहळा आयोजित केला जातो. यावर्षी अखंड शिवनाम सप्ताहाची सुरुवात रविवारी (दि.10) ते शनिवार (दि.16) पर्यंत करण्यात आले आहे. यानिमित्ताने विविध धार्मिक, सामाजिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. शनिवारी (दि.16) संध्याकाळी 7 वाजून 04 मिनिटांनी शनैश्वर जन्मोत्सव साजरा होईल, यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. यावर्षी हा महाप्रसाद शनिमंदिर मध्ये होणार आहे. त्याचबरोबर शनिवारी (दि.09) सायंकाळी 5 वाजता शोभायात्रा हनुमान मंदिर मोंढा येथून राणी लक्ष्मीबाई टाँवर चौक मार्गे शनी मंदिरात काढण्यात येणार आहे. तसेच गुरुवारी (दि.14) भव्य रक्तदान शिबीर सकाळी आठ ते अकरा यावेळेत आयोजित केले आहे. धार्मिक कार्यक्रमात रोज सकाळी शिवपाठ, परमरस्य पारायण, शनि महात्म्य पारायण, गाथा भजन, प्रवचन आदि कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. या सर्व कार्यक्रमास पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचे जिल्हाध्यक्ष संगमेश्वर फुटके व श्री. शनिमंदिर देवस्थान ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.

## पान 4 वरुन

सावे यांनी दिले आहेत.6. विभागाची नवीन कार्यालये – सुधारित आकृतिबंधानुसार नवीन पदांचे सेवाप्रवेश नियम जलदगतीने पूर्ण करुन विभागाची कार्यालये लवकरात लवकर कार्यान्वित करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. दरम्यान, सरकारने घेतलेल्या या निर्णयाचे दिव्यांग बांधवांकडून स्वागत केल जात आहे.

--------------------------------------

नगर अशा अर्ध्या परळी शहराची पाणीपातळी अवलंबुन आहे.परळी नगरपालिका सध्या सरस्वती नदीवर शासनाचा प्रोजेक्ट राबवण्याच्या तयारीत असुन यामध्ये दोन्ही बाजुंनी भिंती व तळाला क्रॉंक्रीट केले जाणार असल्याने केंद्र व राज्य शासनाच्या पाणी अडवा पाणी जिरवा या मोहिमेला छेद बसण्याबरोबरच पवित्र सरस्वती नदीचे नैसर्गिक अस्तित्व नष्ट होणार आहे.आपण महाराष्ट्रात इतर ठिकाणच्या नद्यांचे सुशोभिकरण करुन पर्यावरणाचा समतोल राखला जात असताना सरस्वती नदीचे मात्र सिमेंटीकरण करण्यात येत आहे.पवित्र सरस्वती नदीवर पर्यावरणपुरक असा सुशोभिकरणाचा प्रोजेक्ट राबवावा ही विनंती.सरस्वती नदीपात्रातील अतिक्रमण हटवुन नदीचे पात्र मोकळे करत काही ठिकाणी घाट,वॉकिंग ट्रॅक,झाडे-हिरवळ लावुन सुशोभिकरण झाले तर ही परळी शहरातील नागरीक आणि बाहेरगावहुन येणार्या वैद्यनाथ भक्तांसाठी मोठी उपलब्धी असेल.तरी आपण या जनभावनेचा विचार करुन सध्याचा सिमेंट काँक्रीटीकरणाचा प्रस्ताव रद्द करुन पर्यावरणपूरक प्रस्ताव राबवावा अन्यथा आम्ही सर्व वैद्यनाथभक्त आंदोलन करणार असल्याचा इशारा सौ.वर्षाताई जोशी यांनी दिला आहे.या निवेदनाच्या प्रति

पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री ना.पंकजाताई मुंडे,माजी मंत्री आ.धनंजय मुंडे,जिल्हाधिकारी बीड,उपविभागिय अधिकारी परळी वैजनाथ यांना देण्यात आल्या आहेत.

---------------------------------------

जीवितहानी झाली असून अनेक नागरिकांना कायमचे अपंगत्व आल्याचा दावाही त्यांनी केला आहे. रस्त्यांच्या कडेने वाढलेली काटेरी झुडपे, तसेच काही ठिकाणी दुभाजकाजवळ साचलेली माती यामुळे वाहनचालकांना अतिरिक्त अडथळ्यांचा सामना करावा लागत असल्याचेही ते म्हणाले. नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांकडून वारंवार तक्रारी, निवेदने आणि आंदोलने करूनही सार्वजनिक बांधकाम विभाग, एमएससीआरडीसी आणि जिल्हा प्रशासनाकडून ठोस दुरुस्ती होत नसल्याची टीका त्यांनी केली आहे. दरम्यान, जिल्हा प्रशासनाच्या रस्ता सुरक्षा समितीच्या बैठकीत जिल्ह्यातील अपघातांमध्ये 33 टक्के घट झाल्याचा दावा करण्यात आला असून, बीड जिल्ह्याने रस्ते सुरक्षेत राज्यात दुसरा क्रमांक मिळवल्याची माहिती देण्यात आली होती. मात्र, प्रत्यक्षात रस्त्यांची अवस्था गंभीर असताना अशा आकडेवारीने प्रशासन स्वतःची पाठ थोपटत असल्याची संतप्त प्रतिक्रिया डॉ. ढवळे यांनी व्यक्त केली.

कंत्राटदारांकडून आदेशांकडे दुर्लक्षाचा आरोप

रस्ता सुरक्षा समितीच्या बैठकीत देण्यात आलेल्या निर्देशांकडे कंत्राटदारांकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. अहमदपूर-अहिल्यानगर महामार्गावरील लिंबागणेश परिसरातील अपघातप्रवण क्षेत्रात गतिरोधक बसविण्याबाबत 6 नोव्हेंबर 2025 रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाने आदेश दिले होते. मात्र सहा महिने उलटूनही अद्याप अंमलबजावणी न झाल्याने आदेशांना 'केराची टोपली' दाखवली जात असल्याची टीका होत आहे. या प्रकरणामुळे जिल्हा प्रशासन आणि कंत्राटदारांवर नियंत्रण नसल्याचे चित्र निर्माण झाले असून, रस्त्यांच्या दुरुस्तीबाबत तातडीने ठोस उपाययोजना करण्याची मागणी जोर धरु लागली आहे.

---------------------------------------

आठवड्यांच्या आत लागावा अशी विनंती याचिकाकर्त्यांच्या वतीने करण्यात आली होती. या प्रकरणावर न्यायमूर्ती श्रीमती विभा कंकणवाडी आणि न्यायमूर्ती अजित बी. कडेठाणकर यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. सुनावणी दरम्यान सरकारी वकिलांनी सूचनांनुसार माहिती दिली की, सदर अर्जावरील निकाल पुढील चार आठवड्यांत घोषित केला जाईल. न्यायालयाने हे विधान हमीपत्र म्हणून स्वीकारले आणि जिल्हाधिकाऱ्यांना चार आठवड्यांच्या आत निकाल देण्याचे निर्देश देऊन ही रिट याचिका निकाली काढली. या प्रकरणात याचिकाकर्त्यांतर्फे ड. नरसिंह जाधव यांनी काम पाहिले, तर शासनाच्या वतीने एजीपी मिस नेहा बी. कांबळे यांनी बाजू मांडली. राजकीय दबाव ; उच्च न्यायालयाचे आदेश असतानाही प्रकरण दोन वर्षांपासून प्रलंबित पाटोदा नगर पंचायतचे दोन सदस्य (1. माजी जिल्हा परिषद अध्यक्ष बीड- सय्यद अब्दुल्ला 2. माजी नगराध्यक्ष पाटोदा- बळी पोटे) या दोघांचे नगरसेवक अपात्रता प्रकरण बीड जिल्हाधिकाऱ्यांकडे गेल्या दोन वर्षांपासून निकालासाठी प्रलंबित असून, उच्च न्यायालयाने यापूर्वी देखील निर्णय जाहीर करण्याबाबत निर्देश दिले असतानाही केवळ राजकीय दबाव असल्याने हे प्रकरण निकालासाठी लाल फीतीत अडकवून ठेवण्याचे काम जिल्हा प्रशासनाकडून सुरु असल्याचे दिसून येत आहे. दरम्यान जिल्हा प्रशासन राजकीय दबावाखाली उच्च न्यायालयाच्या निर्देशावर कारवाई करण्यात हलगर्जीपणा करत असेल तर सर्व सामान्य जनतेला जिल्हा प्रशासनाकडून काय न्याय मिळणार आहे असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित केला जात आहे.

------------------------------------------

समितीन कोणती कामे केली, कोणत्या दिशेने अभ्यास सुरु केला आहे की अजून फक्त कागदापुरतीच समिती सिमित राहिली आहे हे कळत नसल्याने गोरबंजारा समाज आक्रमक झाला असून अभ्यास समितीने पाच महिन्यातील केलेली कामे गोरबंजारा समाजापुढे मांडावीत या मागणीसाठी गोरसेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा संदेश चव्हाण यांच्या नेतृत्वात आज राज्यभर 300 पेक्षा अधिक जागेवर निवेदन देण्यात आले आहे.

संपूर्ण भारतातील 14 करोड गोरबंजारा समाजाची जन्मापासून तर मरेपर्यंत स्वतंत्र गोरधाटी असून आदीम सभ्यतेची संपूर्ण लक्षणे गोरबंजारा समाजात दिसतात देशातील अनेक राज्यात त्यांना यामुळेच एस.टी.प्रवर्गातून आरक्षण दिलेले आहे मात्र महाराष्ट्र राज्यात विमुक्त जाती अ प्रवर्गात सामावेश केलेला आहे.मात्र गोरबंजारा समाजाचे राहणीमान वागणूक, रुढी परंपर,विशिष्ट ठिकाणी तांडा करुन राहणे,गोरबोली, गोरधाटी, पेहराव,आर्थिक मागासलेपण,स्वभावातील लाजबुजरेपणा हे आदिम सभ्यतेची संपूर्ण लक्षणे गोरबंजारा समाजात दिसतात म्हणून त्यांना एसटी प्रवर्गाचा समांतर आरक्षण द्यावे ही गेल्या 75 वर्षापासूनची मागणी आहे गेल्यावर्षी याच मागणीसाठी राज्यात 55 पेक्षा अधिक लाखोच्या संख्येने महामोर्चे निघालेत.पाच युवकांनी आपले जिवन संपवून शहीद झालेत.अनेकांनी आमरण उपोषण केले, रास्ता रोको केले.मात्र सरकारने दखल घेतली नाही म्हणून गोरसेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा संदेश चव्हाण यांनी समृद्धी महामार्गावर हजारो गोर सैनिक उतरवून रास्ता रोखला तेव्हा सरकारने सकारात्मक चर्चा करण्यासाठी मुंबई येथे 4 नोव्हेंबर रोजी बंजारा शिष्टमंडळासोबत चर्चा केली व अभ्यास समिती उच्च न्यायालयाचे न्यायाधीश तहलियानी यांच्या अध्यक्षतेखाली एक अभ्यास समिती नेमण्यात आली मात्र गेल्या पाच महिन्यात समितीने नेमके कशाचा अभ्यास केला, कोणत्या दिशेने केला, याबाबत समाजाला आजपर्यंत काहीच माहिती दिलेली नाही तेव्हा ही समिती केवळ कागदापुरतीच सिमित तर नाही ना अशी शंका गोरबंजारा समाजात निर्माण झाली असून अभ्यास समितीने आजपर्यंत नेमके काय काय केले हे समजून घेण्यासाठी गोरसेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा संदेश चव्हाण यांच्या नेतृत्वात आज जिल्हाधिकारी, तहसीलदार व उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे. निवेदन देतांना गोरसेनेचे तालुकाध्यक्ष मा. विनोदभाऊ राठोड गोरसेनेचे कार्यकर्ते प्रेम चव्हाण,

रमेश चव्हाण सर बाळू राठोड संतोष जाधव विशाल चव्हाण सचिन पवारमोहन पवार दत्तात्र्य राठोड संतोष राठोडयुवराज राठोड उपस्थित होते

----------------------------------

अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. आग लागल्याचे लक्षात येताच रामभाऊ रेपे हे गोठ्यातील जनावरे सोडवण्यासाठी आत गेले. मात्र, आगीने काही क्षणांतच भीषण रुप धारण केल्याने गोठ्याचे लाकडी छत कोसळले. त्यामुळे त्यांना बाहेर पडता आले नाही आणि आगीत अडकून त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला.

या दुर्घटनेत एकूण 8 जनावरे, 15 शेळ्या आणि सुमारे 150 कोंबड्या होरपळून मृत्युमुखी पडल्या आहेत. तसेच कोठ्यातील चारा व इतर साहित्यही आगीत भस्मसात झाले. घटनेची माहिती मिळताच अग्निशामक दलाचे बालाजी शिनगारे, संजय गायसमुद्रे यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन आग आटोक्यात आणली. तसेच घटनेस्थळी तात्काळ धारूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक देवीदास वाघमोडे सह पोलीस अधिकारी कर्मचारी यांनी भेट दिली.

यावेळी पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी ग्रामीण रुग्णालयात पाठवला आहे. दरम्यान, धारूर तहसीलचे तहसीलदार श्रीकांत निळे यांनीही घटनास्थळी भेट देऊन नुकसानीची पाहणी केली असून संबंधित कुटुंबाला शासकीय मदत मिळावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. या घटनेमुळे रेपेवाडी परिसरात शोककळा पसरली आहे.

--------------------------------------

आणि ग्रामपंचायत कर्मचारी मंगेश भरत माने (वय 45) यांच्या कुटुंबीयांमध्ये 4 मे रोजी रात्री वाद झाला होता.

या वादाचा राग मनात धरुन 5 मे रोजी दुपारी सुमारे 2 वाजता माने यांनी केज-कळंब मार्गावरील सुर्डी फाट्यावर असलेल्या राहुल शेलार यांच्या वडापावच्या टपरीवर बसलेल्या ठोंबरे यांच्यावर काठीने बेदम मारहाण केली. या मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या ठोंबरे यांना तातडीने धाराशिव जिल्ह्यातील कळंब येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

या प्रकरणी मयत ठोंबरे यांचा मुलगा बालाजी ठोंबरे यांच्या फिर्यादीवरून मंगेश माने याच्याविरुद्ध 5 मे रोजी रात्री साडेआठच्या सुमारास युसुफवडगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल होताच पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले आहे. दरम्यान, मयत ठोंबरे यांचे शवविच्छेदन कळंब येथील उपजिल्हा रुग्णालयात करण्यात आले असून पुढील तपास युसुफवडगाव पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलिस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे करीत आहेत.

----------------------------------------

पोलिसांनी कंटनेर चालकाला ताब्यात घेतले आहे.

प्रतीक्षा रामेश्वर चौधरी (वय 45 रा. शिराळा ता. बार्शी ह.मु.क. पिंपळगाव ता. वाशी जि. धाराशिव) असे अपघातात ठार झालेल्या महिलेचे नाव आहे. प्रतीक्षा चौधरी यांच्या भावाचे दोन दिवसांनी लग्न असल्याने त्या बीडमध्ये भाऊ व भावजयीसोबत बुधवारी दुपारी आल्या होत्या. प्रतिक्षा चौधरी यांचा भाऊ प्रदिप गव्हाणे हा दुचाकी चालवत होता तर त्यांच्यासोबत निशा गव्हाणे या देखील होत्या. त्यांची दुचाकी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास साठेचौकातून जात असताना कंटनेरने धडक दिल्याने त्या खाली पडल्या, त्यांच्या डोक्यावरुन कंटनेरचे चाक गेल्याने त्या गंभीर जखमी झाल्या.

------------------------------------

त्यांची यादी या अगोदरच जाहीर करण्यात आलेली होती पण त्यांना नियुक्त्या दिल्या गेल्या नव्हत्या पण त्यांचे पुर्ण शैक्षणिक कागदपत्र पडताळणी करुन त्यांना आज पोलिस पाटील म्हणून अधिकृत नियुक्त्या दिल्या धारूर तालुक्यातील तेलगाव ( बु ) येथिल कु ज्योती अशोक लगड या तेलगाव येथिल पोलिस पाटील करिता पात्र ठरल्या असत्या त्यांना त्यांच्या भागातील पोलिस स्टेशन दिंद्रुड येथे नियुक्ती पत्र दिले असता तेलगाव येथिल गाव गाड्यातील मानाचे पोलिस पाटील हे पद मिळून कायदा - सुव्यावस्थेतील या गावची दोरी कु ज्योती लगड यांच्या हाती आली असता या गावच्या कन्येचे सर्वत्र कौतुक होताना दिसत आहे

-----------------------------------------

जिल्ह्यमध्ये राजकिय पटलावर मा श्री भागवतजी दराडे साहेब यांचे नाव मोठे आहे सोळंके घराण्याचा राजकिय आशिर्वाद त्यांना चांगल्या प्रकारे आहे श्री भागवत दराडे हे चांगले व्यक्तिमत्व असून पाण्यासारखा राजकिय नितळ चेहरा स्वच्छ प्रतिमा असलेला युवा उद्योजक / सरपंच म्हणून त्यांची ख्याती आहे कासारी ( बो ) येथे त्यांच्या वाढदिवसा निमित्त ठेवलेल्या किर्तण सेवेनंतर नागरिकांना महाप्रसाद देऊन नंतर संपूर्ण कासारी ( बो ) गावच्या वतिने त्यांचे औक्षण करुन त्यांचा सन्मान करुन त्यांचा सत्कार करण्यात आला व प्रत्येकांनी त्यांना ॥ आयुष्यमान भव ॥ म्हणून लाखमोल शुभेच्छा दिल्या या सांप्रदायिक कार्यक्रमाला नागरिकांसह महिलांची मोठी गर्दी होती

-------------------------------------

नावे खालीलप्रमाणे आहेत:

उत्तम बाबू केदार: (प्रकृती गंभीर - बीड येथील रुग्णालयात उपचार सुरु).

अश्रूबा राजाभाऊ देशमुख व पंचफुला दिगंबर जाधव: (स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालय, अंबाजोगाई).

ज्ञानेश्वर बापू पोते: (ग्रामीण रुग्णालय, केज).

चंद्रसिंग सखाराम पोते व फुलचंद मोहन पोते: (प्राथमिक आरोग्य केंद्र, विडा).

नंदकिशोर मुंदडा व संदीप पाटील यांची तत्परता

घटनेचे गांभीर्य ओळखून अंबाजोगाईचे ज्येष्ठ नेते तथा नूतन नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा आणि शरद इंगळे यांनी तातडीने दखल घेतली. जखमींना दर्जेदार वैद्यकीय सेवा मिळावी यासाठी त्यांनी रुग्णालय प्रशासनाला सूचना दिल्या आहेत. तसेच केज तालुका भाजप अध्यक्ष संदीप पाटील आणि स्थानिक तरुणांनी वेळेवर वाहनांची सोय करून जखमींना रुग्णालयात पोहचवल्याने पुढील अनर्थ टळला.

"वनविभागाने आता तरी जागे व्हावे!" "सतत होणाऱ्या रानडुकरांच्या हल्ल्यांमुळे शेतकरी दहशतीखाली आहे. वनविभागाने या हिंस्र प्राण्यांचा तातडीने बंदोबस्त करावा आणि जखमी शेतकऱ्यांना त्वरित शासकीय आर्थिक मदत मिळवून द्यावी," अशी आग्रही मागणी जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा व शरद इंगळे यांनी केली आहे.

वनविभागाच्या निष्काळजीपणाबद्दल शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात असून, आता प्रशासन काय पाऊल उचलणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

------------------------------------------

कारण पुढे करत कंपन्यांनी ही सवलत तडकाफडकी बंद केली आहे. आता पंपचालकांना इंधनासाठी संपूर्ण रक्कम आगाऊ (Advance) भरावी लागत आहे.

शेतीची कामे ठप्प, वाहतूकदार अडचणीत

सध्या शेतीचा हंगाम जोमात असतानाच डिझेलचा तुटवडा निर्माण झाल्याने बळीराजा संकटात सापडला आहे.

यंत्रांना ब्रेक: डिझेलअभावी ट्रॅक्टर आणि इतर शेती अवजारे उभी आहेत.

वाहतूक कोंडी: मालवाहू वाहनांची चाके थांबल्याने जीवनावश्यक वस्तूंच्या पुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता आहे.

ग्राहकांचा रोष: पंपांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या असून, इंधन मिळत नसल्याने ग्राहकांचा कर्मचाऱ्यांशी वाद होत आहे.

'पैसे देऊनही इंधन मिळेना' – पंपचालकांची व्यथा

पंपचालकांनी कंपन्यांकडे लाखो रुपये जमा केले आहेत, तरीही वेळेवर टँकर उपलब्ध होत नसल्याची ओरड होत आहे. "आम्ही हप्त्या-हप्त्याने पैसे भरुनही पुरवठा साखळी विस्कळीत आहे. ग्राहकांना काय उत्तर द्यावे, हेच आम्हाला समजेनासे झाले आहे," अशी हताश भावना केजमधील एका पंपचालकाने व्यक्त केली.

तातडीच्या हस्तक्षेपाची मागणी

मराठवाड्यातील विशेषतःकेज शहर व परिसरातील ग्रामीण भागातील ही परिस्थिती हाताबाहेर जाण्यापूर्वी शासनाने आणि पेट्रोलियम मंत्रालयाने यात तातडीने हस्तक्षेप करावा. तेल कंपन्यांना पुरवठा सुरळीत करण्याचे आदेश द्यावेत, अन्यथा संपूर्ण वाहतूक व्यवस्था कोलमडून पडेल, असा इशारा इंधन विक्रेत्यांच्या संघटनेने दिला आहे.

-------------------------------------

अधीक्षक व्यंकट राम यांनी त्यांचे पथकातील पोलिस उपनिरीक्षक जावेद कराडकर यांना कारवाईचे आदेश दिले.

आदेश मिळताच पोलिस उपनिरीक्षक जावेद कराडकर आणि पोलिस हेडकॉन्स्टेबल बालासाहेब डापकर, पोलिस कॉन्स्टेबल राजू गुंजाळ, महिला पोलिस कॉन्स्टेबल राधा चव्हाण हे दोन पंचासह खाजगी वाहनाने शिरपूरा शिवारात रवाना झाले. व्यंकटराम यांच्या पथकाने शिरपुरा गावाच्या पश्चिमेस, शिरपुरा ते काळेगांव जाणारे रोडचे उत्तर बाजुस मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी सायंकाळी 7:30 वाजण्याच्या सुमारास छापा टाकला असता महादेव घुले यांची पत्नी घरी होती.

पोलिसांनी त्या घराची झडती घेतली असता त्या पश्चिममुखी घरातील पाठीमागच्या रुममध्ये महाराष्ट्र शासनाने बंदी घातलेला व राज्यात प्रतिबंधीत केलेला डायरेक्टर स्पेशल, तंबाखू , आर एम डी पान मसाला, राजनिवास पान मसाला, गोवा गुटखा, विमल पान मसाला, राजनिवास सुगंधित पान मसाला रु., जाफराणी जर्दा असा एकूण 3 लाख 8 हजार 392 रु. चा गुटखा व तंबाखू आणि एक पांढऱ्या रंगाची स्कॉर्पिओ गाडी असा एकूण 11 लाख 8 हजार 392 रु.रु. चा मुद्देमाल जप्त केला.

थक प्रमुख पोलिस उपनिरीक्षक सय्यद जावेद कराडकर यांच्या फिर्यादी वरून महादेव घुले याच्या विरुद्ध केज पोलिस ठाण्यात गु. र. नं. 268/2026 भा. न्या. सं. 123, 274, 275, 223 नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईत पोलिस उपनिरीक्षक जावेद कराडकर आणि पोलिस हेडकॉन्स्टेबल बालासाहेब डापकर, पोलिस कॉन्स्टेबल राजू गुंजाळ यांच्यासह पोलिस उपनिरीक्षक अमिरोद्दीन इनामदार, पोलिस हेडकॉन्स्टेबल अनिल मंदे, संतोष गित्ते, पोलिस हेडकॉन्स्टेबल राजू वंजारे, पोलिस कॉन्स्टेबल चंद्रकांत काळकुटे, अशपाक इनामदार यांनी सहभाग घेतला. पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक संदीप मांजरमे हे करीत आहेत.

----------------------------------






हॅलो बीड
परळी संघर्षनेता
शुक्रवार दि. 08 मे 2026


# कर्जाची मर्यादा वाढणार, राज्य सरकारचा सर्वात मोठा निर्णय, अनेकांना होणार फायदा;




राज्य सरकारकडून वेळोवेळी सामान्यजनांच्या हिताच निर्णय घेतले जातात. नुकतेच राज्याच्या दिव्यांग कल्याण विभागाने मोठा निर्णय घेतला आहे. या विभागाचे मंत्री अतुल सावे यांनी दिव्यांग बांधवांना खऱ्या अर्थाने स्वावलंबी बनवण्यासाठी सक्षमीकरण विभागाचा सविस्तर आढावा घेतला आहे. तसेच अनेक महत्त्वपूर्ण निर्देश दिले. यापैकी दिव्यांग कर्ज योजनेची मर्यादा वाढविण्यासाठी प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

1. कर्ज मर्यादा 50 हजारांवरून 5 लाखांपर्यंत – सध्या दिव्यांग बांधवांना वैयक्तिक कर्जाची मर्यादा केवळ 50 हजार रुपये आहे. ही मर्यादा अत्यंत अपुरी आहे. त्यामुळे ओबीसी विभागाच्या व्याज परतावा योजनेच्या धर्तीवर दिव्यांगांसाठी कर्ज मर्यादा थेट 5 लाख रुपयांपर्यंत वाढवण्यासाठी सविस्तर प्रस्ताव तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.2. ई-व्हेईकल योजना – दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगार मिळावा यासाठी सुमारे ₹3.75 लाख किंमतीचे पर्यावरणपूरक ई-व्हेईकल मोफत उपलब्ध करून दिले जाणार आहे.. सन 2025-26 मधील वितरण जलद गतीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत..3. जिल्हा वार्षिक योजनेत 1% निधी दिव्यांगांसाठी राखीव – दिव्यांगांच्या सर्वांगीण विकासासाठी जिल्हा वार्षिक योजनेतील किमान एक टक्का निधी राखीव ठेवण्याबाबत तातडीने मार्गदर्शक सूचना तयार करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.4. UDID कार्ड वितरण – दिव्यांग ओळखपत्र म्हणजेच UDID कार्डचे वाटप जलद गतीने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.कारण हे कार्ड म्हणजे दिव्यांग बांधवांसाठी सर्व योजनांचे प्रवेशद्वार आहे.5. संजय गांधी निवृत्तीवेतन – दिव्यांग लाभार्थ्यांना संजय गांधी निवृत्तीवेतनाची रक्कम दरमहा नियमितपणे वितरित होईल याची खबरदारी घेण्याचे निर्देश अतुल **पान 3 वर**

# पर्यावरणास हाणी पोंहचवणारा सरस्वती नदीवरील सिमेंटीकरणाचा प्रस्ताव रद्द करा-सौ.वर्षाताई जोशी



परळी (प्रतिनिधी)

परळी शहरातुन वाहत असलेल्या सरस्वती नदीचे बारा ज्योतिर्लिंगांपैकी पाचवे ज्योतिर्लिंग असलेल्या प्रभू वैद्यनाथाच्या धार्मिक इतिहासात मोठे महत्व असुन या नदीच्या अस्तित्वामुळेच परळीला पाण्यावरची परळी अशी ओळख आहे.परळी नगरपालिकेने या नदीचे क्रॉंक्रिटीकरण करुन अस्तित्वच संपवण्याचा प्रयत्न सुरु केलेला आहे.यामुळे धार्मिक ठेवा तर नष्ट होणारच आहे परंतु पर्यावरणाची मोठी हाणी होणार असल्याने हा प्रकल्प रद्द करुन पर्यावरणपूरक प्रकल्प राबवावा अशी मागणी भाजपा शहर उपाध्यक्षा सौ.वर्षाताई जोशी यांनी केली आहे.

याबाबत नगरपालिका मुख्याधिकारी यांना निवेदन देत सरस्वती नदीवरील प्रस्तावित प्रकल्प रद्द करण्याची मागणी केली आहे.परळी वैजनाथ शहरातुन वाहत असलेल्या सरस्वती नदीमुळे शहराचा पर्यावरणीय समतोल राखण्यास मोठी मदत होते. या नदीच्या पाण्यामुळे पाणीपातळीसह,तापमानात समतोल राखला जातो.या नदीच्या पाण्यामुळे अंबेवेस, गणेशपार,बरकत नगर,कृष्णा नगर,शिवनगर,इंदिरा नगर,पद्मावती गल्ली,आझाद **पान 3 वर**



● माजलगाव - शिवप्रताप मंगल कार्यालय येथे डीवायएसपी गोविंद गवळी यांच्या विवाहप्रसंगी त्यांना शुभेच्छा देताना संपादक सतीश मुजमुले, विलास गवळी दिसत आहेत. ( छाया-सतीश मुजमुले)

# राष्ट्रीय महामार्गांवरील भेगांमुळे अपघातांचे प्रमाण वाढले; प्रशासनाच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह

## – डॉ. गणेश ढवळे यांची टीका






बीड : बीड जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गांवर जागोजागी पडलेल्या मोठ्या भेगांमुळे दुचाकी वाहनधारकांसाठी रस्ते धोकादायक ठरत असून, या भेगांमध्ये चाके अडकून अनेक अपघात घडल्याने मृत्यू आणि गंभीर जखमींचे प्रमाण वाढल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी केला आहे.

खामगाव-पंढरपूर, अहमदपूर-अहिल्यानगर आणि पैठण-पंढरपूर यांसारख्या महत्त्वाच्या राष्ट्रीय महामार्गांवर मागील काही वर्षांत मोठ्या प्रमाणावर भेगा पडल्या असून, या ठिकाणी वारंवार अपघात होत असल्याचे त्यांनी सांगितले. काही अपघातांमध्ये **पान 3 वर**

# पाटोदा नगर पंचायत सदस्य अपात्रता प्रकरणात जिल्हाधिकाऱ्यांना चार आठवड्यांची मुदत

## ➲ उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाचे आदेश




पाटोदा : बीड जिल्हाधिकाऱ्यांकडे गेल्या दोन वर्षांपासून प्रलंबित असलेल्या पाटोदा नगर पंचायत सदस्य अपात्रता प्रकरणाचा निकाल पुढील चार आठवड्यांत जाहीर करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिले आहेत. शिवभूषण लक्ष्मणराव जाधव आणि शेख मोबीन शेख हमीद यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने हे निर्देश दिले.

अॅड. नरसिंह जाधव यांच्यामार्फत याचिकाकर्ते शिवभूषण लक्ष्मणराव जाधव, शेख मोबीन शेख हमीद यांनी बीड जिल्हाधिकाऱ्यांकडे (प्रतिवादी क्र. 2) दाखल केलेल्या अपात्रता अर्ज क्रमांक 167/2024 आणि अपात्रता अर्ज क्रमांक 168/2024 वर तातडीने निकाल देण्याची मागणी याचिकेद्वारे केली होती.

हा निकाल लवकरात लवकर, शक्यतो दोन **पान 3 वर**

# एस.टी.आरक्षणासाठी नेमलेल्या समितीने पाच महिन्यात केलेल्या कामाचा आढावा द्या-

## परळी तालुका गोर सेनेची राज्यसरकार कडे मागणी



परळी तालुका प्रतिनिधी -गेल्या वर्षी गोरबंजारा समाजाला एस.टी.प्रवर्गातून आरक्षण द्या,हैदराबाद गॅझेट लागू करा आदी मागण्यासाठी गोरबंजारा समाजाने महाराष्ट्रभर 55 महामोर्चे काढले शिवाय गोरसेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा संदेश चव्हाण यांनी समृद्धी महामार्गावर हजारो गोर सनिक उतरवून रास्ता रोको केला व नांदेड रेल्वे रोखण्याचा इशारा दिला होता मात्र राज्यसरकार न सकारात्मक चर्चा करण्यासाठी मुंबई येथे 4 नोव्हेंबर रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व बंजारा समाजातील शिष्टमंडळासोबत सविस्तर चर्चा झाली व एसटी आरक्षणासाठी उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश तहलियानी यांच्या अध्यक्षतेखाली एक अभ्यास समिती नेमण्यात आली मात्र गेल्या पाच महिन्यात **पान 3 वर**

# आगीमध्ये अडकलेल्या गायींना सोडवण्यास गेलेल्या शेतकऱ्याचा मृत्यू

## ● आगीचे तांडव : आठ गायी, पंधरा शेळ्या व तब्बल दीडशे कोंबड्या ठार



धारूर : घराशेजारी असलेल्या गोठ्याला आग लागल्यानंतर आत अडकलेल्या आठ गायींना सोडवण्यासाठी गेलेल्या वृद्ध शेतकऱ्याचा होरपळून मृत्यू झाला. ही घटना धारूर तालुक्यातील रेपेवाडी येथे मंगळवारी रात्री घडली. या आगीमध्ये आठ गायी, पंधरा शेळ्या व दीडशे कोंबड्या ठार झाल्या आहेत. घटनेची माहिती मिळाल्यानंतर अग्नीशामक दलासह पोलिस अधिकाऱ्यांनी रेपेवाडीत धाव घेतली.

रामभाऊ एकनाथ रेपे (वय 80) हे आपल्या पत्नीसह शेतातील गोठ्यामध्ये वास्तव्यास होते. कमी उंचीच्या दगडी भिंती, गवताचे छप्पर आणि एकाच दरवाज्याची रचना असलेल्या या गोठ्याला चुलीमुळे अचानक आग लागल्याचा प्राथमिक **पान 3 वर**

# किरकोळ वादातून टिप्पर चालकाचा खून

## केज तालुक्यातील घटना; आरोपी अटक




केज : केज तालुक्यातील सुर्डी फाटा येथे वडापावच्या टपरीवर झालेल्या मारहाणीत टिप्पर चालकाचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना मंगळवारी दुपारी घडली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी ग्रामपंचायत कर्मचाऱ्याला ताब्यात घेतले आहे.

खुशालराम बलभीम ठोंबरे (55, रा.सुर्डी) असे खून झालेल्या व्यक्तीचे नावआहे. युसुफवडगाव पोलिस ठाणे हद्दीतील सुर्डी येथे खासगी वाहनावर टिप्पर चालक म्हणून काम करणारे खुशालराम बलभीम ठोंबरे (वय 55) यांचे **पान 3 वर**

# भावाच्या लग्नाची खरेदीसाठी आलेली बहीण अपघातात ठार



बीड : दोन दिवसांवर भावाचे लग्न आल्याने खरेदीसाठी बीडमध्ये आलेल्या महिलेचा अपघातात मृत्यू झाला. ही घटना शहरातील साठे चौकात बुधवारी दुपारी एक वाजता घडली. ही महिला ज्या दुचाकीवरून जात होती, त्या दुचाकीला एका कंटेनरने धडक दिली. या प्रकरणी **पान 3 वर**

# तेलगावच्या पोलिस पाटील पदी कु ज्योती लगड यांची नियुक्ती

## दिंद्रुड पोलिस स्टेशन येथे दिले नियुक्ती पत्र



धारूर ( बाबुराव तिडके ) पोलिस पाटील हे पद गावगाड्यातील सर्वोच्च मानाचे पद समजले जाते पुर्वि पोलिस पाटलांच्या थेट नियुक्ती ग्रह विभागातुन होत होती परंतु आता राज्य शासनाने याला छेद देऊन सरळ परिक्षा घेऊन बुद्धीमतेच्या जोरावर व आरक्षणाच्या आलेखा नुसार ठरला

घेतली जाते 2026 इ स मध्ये रिक्त असलेल्या ठिकाणी राज्य सरकारने पोलिस पाटील या पदा करिता सरळ जागा काढून लेखी परीक्षा व तोंडी परीक्षा घेतल्या जो उमेदवार पोलिस पाटील या पदा करिता पात्र **पान 3 वर**

# मा श्री भागवत दराडे यांच्या वाढदिवसा निमित्त कासारी ( बो ) येथे दिली किर्तण सेवा अनेकांनी दिल्या

## ॥ आयुष्यमान भव ॥ शुभेच्छा ॥





धारूर ( बाबुराव तिडके ) जैतापुर / दैठणा गावचे लोकप्रिय सरपंच तथा युवा उद्योजक मा श्री भागवतजी दराडे यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात दरवर्षी वेगवेगळ्या चांगल्या पद्धतीने साजरा केला जातो त्याच धर्तिवर दि 7 मे वार गुरुवार रोजी श्री भागवतजी दराडे यांचा जन्मदिन असल्याने कासारी ( बो ) गावच्या युवक मित्रानी श्री क्षेत्र गुरुदेव बाबा कासारी येथे ह भ प - संतोष ( महाराज ) वनवे ( किर्तण केसरी ) यांच्या किर्तनाचे आयोजन करून या पंचक्रोशितील भक्तांना किर्तण सेवा देऊन महाप्रसाद दिला गेला या वेळी सरपंच श्री भागवतजी दराडे यांची खास उपस्थिती होती दराडे हे राजकिय सामाजिक कामात सतत अग्रेसर असतात ते उद्योग समुहामध्ये एक नाव कमावलेले नामवंत व्यक्तीमत्व आहेत त्यांच्या माध्यामातून अनेक युवकांना रोजगाराच्या संधी मिळाल्या असून ते आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चांगल्या प्रकारे करतात सद्यस्थितीत बीड **पान 3 वर**

# केज तालुक्यात रानडुकरांचा थरार : शिंदी-गप्पेवाडीत 5 शेतकऱ्यांवर रक्ताळलेला हल्ला, एक जण देतोय मृत्यूशी झुंज !



प्रकाश मुंडे | केज तालुका प्रतिनिधी केज तालुक्यातील शिंदी आणि गप्पेवाडी शिवारात रानडुकरांच्या कळपाने घातलेल्या थैमानामुळे संपूर्ण जिल्हा हादरला आहे. शेतात काम करणाऱ्या पाच निष्पाप शेतकऱ्यांवर रानडुकरांनी प्राणघातक हल्ला चढवला असून, यात सर्वजण गंभीर जखमी झाले आहेत. यातील एकाची प्रकृती अत्यंत चिंताजनक असल्याची माहिती समोर येत आहे.

नेमकी घटना काय?

मिळालेल्या माहितीनुसार, शिंदी आणि गप्पेवाडी येथील शेतकरी नेहमीप्रमाणे आपल्या शेतात कृषी कामात व्यस्त होते. दरम्यान, अचानक रानडुकरांच्या एका मोठ्या कळपाने त्यांच्यावर झडप घातली. हा हल्ला इतका अनपेक्षित आणि भीषण होता की शेतकऱ्यांना स्वतःचा बचाव करण्याची साधी संधीही मिळाली नाही. जखमींच्या ओरडण्याने परिसरात खळबळ उडाली आणि ग्रामस्थांनी तातडीने घटनास्थळाकडे धाव घेतली.

जखमींची अवस्था आणि उपचार केंद्र:

जखमींना तात्काळ वेगवेगळ्या रुग्णालयात हलवण्यात आले असून त्यांची **पान 3 वर**

# केज तालुक्यात इंधनाचा 'दुष्काळ'! आगाऊपैसे भरूनही पंप कोरडे; बळीराजासह सर्वसामान्य केजकर संकटात




प्रकाश मुंडे / केज तालुका प्रतिनिधी बीड जिल्ह्यासह संपूर्ण केज शहर व परिसरात गेल्या काही दिवसांपासून पेट्रोल आणि डिझेलचा अभूतपूर्व तुटवडा निर्माण झाला आहे. तेल कंपन्यांच्या बदललेल्या जाचक धोरणांमुळे केज तालुक्यातील इंधन पुरवठा साखळी पूर्णपणे विस्कळीत झाली असून, अनेक पेट्रोल पंपांवर 'नो स्टॉक' चे फलक झळकत आहेत. लाखो रुपये आगाऊ भरूनही इंधन मिळत नसल्याने पंपचालक हवालदिल झाले असून, याचा थेट फटका शेती आणि वाहतूक व्यवस्थेला बसला आहे.

तेल कंपन्यांची 'क्रेडिट' बंद; जागतिक तणावाचा फटका

इंधन पुरवठा करणाऱ्या कंपन्यांनी यापूर्वी पंपचालकांना पाच दिवसांची पत मर्यादा (Credit Limit) दिली होती. मात्र, इराण-अमेरिका युद्धाच्या पार्श्वभूमीवर जागतिक स्तरावर निर्माण झालेल्या तणावाचे **पान 3 वर**

# केज येथे पोलिस पथकाची गुटख्यावर धाड, 11 लाखाचा मुद्देमाल जप्त



केज : तालुक्यातील शिरपूरा येथे सहाय्यक पोलिस अधीक्षक व्यंकट राम यांच्या पथकाने गुटख्यावर कारवाई करुन स्कॉर्पिओ गाडीसह 11 लाखाचा मुद्देमाल ताब्यात घेतला आहे.

सहाय्यक पोलिस अधीक्षक व्यंकट राम यांना 6 मे रोजी अशी माहिती मिळाली की, शिरपुरा (ता. केज) येथील शिवारात महादेव रत्नाकर घुले याने महाराष्ट्र शासनाने बंदी घातलेला व राज्यात प्रतिबंधीत केलेला गुटखा, सुगंधीत पान मसाला, सुगंधीत तंबाखुची चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने घरात साठा करून ठेवलेला आहे. माहिती मिळताच आय पी एस अधिकारी सहाय्यक पोलिस **पान 3 वर**